नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 25/08/2021 (बुधवार)
(दुपार)

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. बोरी – दिनांक 17/08/2021 चे 05.00 वा. ते दिनांक 24/08/2021 चे 20.00 वा. चे सुमारास पो.स्टे. बोरी हद्दीत फिर्यादीची पत्नी ही मोहरम सणाचे कार्यक्रमाकरिता तिचा चुलत मोठा भाउ रा बेला यांचे कडे 5 ते 6 दिवसांकरिता मुक्कामी गेली होती. त्यादरम्यान त्यांची मुलगी वय 16 वर्ष हिची प्रकृती ठिक नसल्याने व मुलगा कंपनीत कामावर जात असल्याने दोघे घरीच होते. घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादीचा मुलगा याने फोन करून सांगितले की, दुपारी 03.00 वा. डयुटी वरून परत घरी आला तेव्हा मुलगी घरी दिसली नाही तिचा शोध घेतला असता मिळाली नाही. फिर्यादी हा परसोडी ला परत आल्याने नातेवाईकाने सांगितले की, गणेश मडावी रा देवळी (निस्ताने) यांचा मुलगा अतुल मडावी हा दि. 17/08/2021 पासुन गावात नाही. त्याचे मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता बंद दाखविला. आरोपी नामे– अतुल गणेश मडावी, अंदाजे वय 22 वर्ष यानेच तिला लग्नाचे आमिष दाखवून फुस लावून फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती आरती उघडे 8355947473 या करीत आहे.

पो.स्टे. बोरी – पो.स्टे. बोरी हद्दीत फिर्यादी यांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि दि. 23/08/2021 चे 10.00 वा. चे सुमारास शाळेत टी.सी. काढण्याकरीता जाते म्हणुन गेली होती. परंतु बराच वेळ झाल्यावर ती घरी परत आली नसल्याने फिर्यादी व तिचे पती यांनी शाळेत जावून विचारपूस केली असता मुलगी शाळेत आलेली नाही असे सांगीतले. त्यानंतर नातेवाइक व शेजारील लोकांना विचारपूस केली परंतु मुलगी कुठेही मिळून आली नाही. मुलीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती आरती उघडे 8355947473 या करीत आहे.

## ाारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. कळमेश्वर :– फिर्यादी नामे– सौ.उज्वला सुदिप पवार वय 25 वर्ष रा. जांब ता. मोवाडी जि. भंडारा ह.मु. श्रीकांत कुरळकर यांचे घरी किरायणे कळमेश्वर व आरोपी नामे– 1) पति– सुदिप दिवाकर पवार यांचे जाती रितीरिवाजाने लग्न झाले. लग्नाचे 1 आठवडया नंतर मौजा जांब ता. मोवाड, जि. भंडारा येथे दिनांक 03/07/2021 चे 18.00 वा. सुमारास आरोपी नामे– 1) सुदिप दिवाकर पवार, 2) दिवाकर पवार, 3) सौ.सुनिता पवार व 4) मोहीत पवार सर्व रा. जांब ता. मोवाडी जि. भंडारा यांनी 'आम्हाला लग्नात खुप खर्च आला' असे म्हणुन आरोपीतांनी फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व

मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. दि. 16/07/2021 रोजी 16.00 वा. आरोपी क्र. 1 ते 4 यांनी फिर्यादी हिला माहेरी सोडुन निघुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक सावळा या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर